PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Chorachya Manat Chandan
Year: 1984

Song: Kasa Pakdala Chor
Lyricist:

गं गं.... मैने
कसा पकडला चोर
झाला लई शिरजोर
कसा पकडला चोर
झाला लई शिरजोर
वर मलाच टोचून बोलनं
चोराच्या मनात चांदणं सदा
चोराच्या मनात चांदणं

ही खटयाळ नार
घेते संशय फार
ही ही खटयाळ नार
घेते संशय फार
बरं नाही सखे असं वागणं
चोराच्या मनात चांदणं जसं
चोराच्या मनात चांदणं

बहाणा धंद्याचा सांगून घरी
काय
हो हो
फिरता न्याहाळत तरण्या पोरी
मी
मग
बहाणा धंद्याचा सांगून घरी
फिरता न्याहाळत तरण्या पोरी
जात पुरूषांची चंचल भारी
करी चिंता घरची कस्तुरी

जात पुरूषांची चंचल भारी
करी चिंता घरची कस्तुरी
मी उपाशी हयांचं बाहेर जेवण
चल
चोराच्या मनात चांदणं सदा
चोराच्या मनात चांदणं

जातो दुकानी दुकानी लागेना ध्यान
घरी बायको बायको ही रूपाची खाण
दिवे ओवाळा दिवे
गं जातो दुकानी दुकानी लागेना ध्यान
घरी बायको बायको ही रूपाची खाण
मैना पोपटाची जीव की प्राण
चला कुणाला खरंच वाटेल
गं मैना पोपटाची जीव की प्राण
पडद्याआड हवं स्त्रीधन
उगा शंकेने काढतेस भांडण
हयँ चोराच्या मनात चांदणं सदा
चोराच्या मनात चांदणं

नाय चालायची पुन्हा ही चूक
आहे तुझ्याच प्रीतीची भूक
हे... नाय चालायची पुन्हा ही चूक
गं मला तुझ्याच प्रीतीची भूक
आता देवाला देवाला एकच मागणं
घरी येऊ दे येऊ दे बाळाचं रांगणं
आता देवाला देवाला एकच मागणं

Literacy for a Billion

घरी येऊ दे येऊ दे बाळाचं रांगणं
घरी येऊ दे बाळाचं रांगणं
नको चोराच्या मनात चांदणं

नको चोराच्या मनात चांदणं
नको चोराच्या मनात चांदणं
नको नको चोराच्या मनात चांदणं

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*